N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): अमरावती ग्रामीण
**P.S.**(ठाणे): खोलापूर
**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0020
**Year** (वर्ष): 2025
**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 12/02/2025 03:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): मंगलवार
**Time Period** (कालावधी): पहर 5
**Date From** (दिनांक पासून): 11/02/2025
**Date To** ( दिनांक पर्यंत): 11/02/2025
**Time From** (वेळेपासून): 14:28 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:38 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 12/02/2025 **Time** (वेळ): 03:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 005
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 12/02/2025 03:18 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 12 कि.मी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): ग्राम सोनारखेडा तामातकुली जि

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** तेजस प्रभाकरराव चंदर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ढंगारखेडा, पोस्ट वाकी रायपुर,खोलापूर,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ढंगारखेडा, पोस्ट वाकी रायपुर,खोलापूर,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9730722969

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.सोनू मुरलीधर सोळंके | | | 1. ग्राम सोनारखेडा ताभातकुली, खोलापूर,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 36,000/रु. लाच रक्कम | 36,000.( |



10 ·

11.

12

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):
36,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
हकिगत अश्या प्रकारे आहे की लेखी रिपोर्ट पोलीस स्टेशन खोलापुर फिर्याद दिनांक: 12/02/2025श्री.तेजस प्रभाकरराव धंदर, वय 24 वर्ष, व्यवसाय शासकीय कंत्राटदार-शिक्षण डिप्लोमा इन सिव्हिल, रा. ढंगारखेडा, पोस्ट वाकी रायपुर, ता. भातकुली, जि. अमरावती मो-9730722969 मी माझी फिर्याद देतो की, दि.10/02/2025 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अमरावती येथे हजर येवून तक्रार दिली होती की, मी वर नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह राहत असुन माझे नावावर स्वतःचे शासकीय कंत्राटदारीचा परवाना आहे. मी सन 2022 पासुन विविध शासकीय विभागाचे वेगवेगळ्या कामाचे कंत्राट घेतो. मी सप्टेंबर 2024 मध्ये पंचायत समिती भातकुली, अंतर्गत ग्रामपंचायत सोनारखेडा येथील निघालेल्या निवीदा सुचना अंतर्गत कामाची निवीदा भरली होती. त्या अंतर्गत मला ग्रामपंचायत सोनारखेडा ता.भातकुली जि.अमरावती गावाची अनुक्रमे काम क्र. 1) गुरांचा धर्माळा बांधणे करिता किंमत एकुण 1,30,000/- रूपये व 2) प्लॉस्टीक शेड व शोषखड्डे बांधणे करिता किंमत एकुण 1,40,000/-रुपये अशी दोन कामे एकुण रक्कम 2,70,000/- रुपयाची कामे मिळाली व सदर काम सुरु करण्याबाबतचा कार्यरंभ आदेश दि.10/09/2024 रोजी मिळाला होता. त्यावरुन मी सदरची कामे वेळेत पुर्ण केलेली आहेत. तसेच वरील क्र.1 चे काम पुर्ण झाल्याबाबत शाखा अभियंता,पंचायत समिती भातकुली व उपअभियंता जि.प.उपविभाग क्र.2 अमरावती यांनी प्रमाणपत्र दिले आहे. तसेच काम क्र.2 पुर्ण झाल्याबाबत ग्रामपंचायत सोनारखेडा येथील सरपंच व सचिव यांनी मा.उपअभियंता जि.प.पाणीपुरवठा उपविभाग,अमरावती यांना पत्र दिल्यावरुन मा.उपअभियंता जि.प. पाणीपुरवठा उपविभाग,अमरावती काम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यानंतर मला दि.08/02/2025 रोजी वरील दोन्ही कामाचे बील शासकीय कपातीकरुन 02,45,971/- रुपये माझे सेंट्रल बॅंक ऑफ इंडीया शाखा वाठोडा शुक्लेश्वर येथील बॅंक अकाउंट क्र.5555737401 वर ग्राम पंचायत सोनारखेडा यांच्या बॅक खात्यातुन जमा झालेले आहे. तसेच मला ग्राम उदापुर येथील पिण्याचे पाण्याचा नवीन स्त्रोत बोरवेलचे काम मिळाले असुन ते काम करणे बाकी आहे. त्यानंतर दिनांक 08/02/2025 रोजी मला ग्रामपंचायत सोनारखेडा येथील ग्रा.पं.सचीव श्री.नक्वी साहेब यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9822621626 वरील व्हॉटसअॅप वरुन 11.49 वाजता माझे मोबाईल क्र.9730722969 वरील व्हॉटस्अॅप वर मॅसेज पाठवून मी केलेल्या कामाबददल एका कागदी चिठठीवर कामाचे नाव व त्यापुढे कामाची रक्कम नमुद करुन चिठठी पाठविली. त्यामध्ये पहील्या कामासमोर 20 हजार, दुसऱ्या कामासमोर 21हजार व तिसऱ्या कामासमोर 15 हजार असे लिहले होते. व एका कोपऱ्यामध्ये ''तेजसला सांगुन सरपंच ताईला रक्कम अदा'' असे नमुद होते. त्यानंतर काही वेळाने ग्रा.पं.सचीव श्री.नक्वी यांनी माझे मोबाईलवर संपर्क करुन सांगीतले की, ''संरपच बाई यांनी माझे मोबाईल वरील व्हॉटअॅपवर चिठठी लिहून पाठविली आहे. ती मी तुमच्या मोबाईल वर पाठविली आहे. तुमचा काय विषय आहे ते तुम्ही पाहुन घ्या'' असे म्हटले. त्यामुळे सदरची गोष्ट मी माझे वडीलांना सांगितली असता, त्यांनी सरपंच सौ.सोनुताई सोळंके यांना फोनव्दारे संपर्क करुन विचारले असता त्यांनी माझे वडीलांना म्हटले की,''मीच चिठठी पाठविली आहे, तुम्ही तेजसला पाठवुन दया'' असे सांगितले.
मी ग्रामपंचायत सोनारखेडा येथे वरील प्रमाणे दोन कामे केली असुन सदरची कामे पुर्ण केल्याने त्याबाबतची संपुर्ण बिलाची रक्कम ग्रामपंचायत मार्फत मला मिळाली आहे. तसेच ग्राम उदापुर येथील बोअरवेलचे काम सुध्दा मला मिळवून दिले असुन सदरची कामे व त्यापैकी दोन कामाची रक्कम मला मिळुन देण्यासाठी सरपंच यांनी मला मदत केली व कामाचे बिल सुध्दा मिळवुन दिले. त्यामुळे केलेल्या कामाच्या मोबदल्यात सरपंच यांनी मला बक्षिस म्हणुन दोन्ही कामाकरिता असे मिळुन रक्कम 41,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहेत. परंतु मला सरपंच सौ सोनुताई सोंळके ग्रामपंचायत सोनारखेडा यांना लाच देण्याची अजिबात ईच्छा नाही. तसेच माझा त्यांच्यासोबत व्यक्तीगत कुठलाही आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा कुठलेही भांडण नाही. त्यासंबंधाने आज रोजी मी आपले कार्यालयात येवून तक्रार देत आहे. तरी त्यांचेवर अॅन्टी करप्शनची कायदेशिर कारवाई व्हावी अशी मी पोनी

तागड साहेब यांचे समक्ष लेखी तक्रार दिली होती.

त्यानंतर तागड साहेब यांनी पत्र देवुन दोन सरकारी पंच बोलावुन घेतले त्यापैकी पंच क्र. 1 म्हणुन श्री.अमोल इंगळे हे काम पाहतील व पंच क्र. 2 श्रीकृष्ण कोहरे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरवण्यात आले. त्यानंतर तागड साहेब यांनी पडताळणीपुर्व कार्यवाही करून सरपंच सौ.सोनु सोळंके यांची मला लाचेची मागणी आहे किंवा नाही? याबाबत पडताळणी कार्यवाही करणार असल्याचे सांगितले व सरपंच सौ.सोनु सोळंके यांची आज भेट होईल अगर कसे? याबाबत विचारले असता मी तागड साहेब यांना सांगितले की, दि.11/02/2025 रोजी आपली सरपंच सौ. सोनु सोळंके यांची त्यांचे राहते घरी सोनारखेडा येथे भेट होईल असे सांगितले. त्यामुळे सर्वानुमते दि. 11/02/2025 रोजी सरपंच सौ.सोनु सोळंके यांची लाच मागणीबाबत पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तागड साहेबांनी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पडताळणीपुर्व पंचनामा केला.

त्यानंतर तागड साहेब दि. 11/02/2025 रोजी त्यांचे स्टाफ व पंचासह सोनारखेडा गावाजवळील नंदी मंदीराजवळ आले मला व दोन्ही पंचांना पडताळणी कारवाई संबधाने सुचना दिल्या. त्यांनतर माझे जवळ रेकॉरडर सरू करून देवुन पंच क्र.1 श्री.अमोल इंगळे यांचेसह सरपंच सौ.सोनु सोळंके यांची लाच मागणीबाबत पडताळणी कार्यवाही करणेकरीता रवाना केले त्यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान माझी सरपंच सौ.सोनु सोळंके त्यांचे राहते घरी सोनारखेडा येथे भेट झाली. त्यावेळी मी माझे कामासंबंधाने सरपंच सौ.सोनु सोळंके यांचेशी बोललो असता, सरपंच सौ.सोनु सोळंके यांनी मी ग्रामपंचायत सोनारखेडा अंतर्गत दोन वेगवेगळी बांधकामे केले असून केलेल्या कामाचे बिल मिळाले आहे. सदरचे काम मिळवून देवून तसेच त्याचे बिल सुध्दा मिळवून दिले व ग्राम उदापुर येथील बोअरवेलचे काम मिळवून दिले. असे तिनही कामाचे मिळून हिशोब सांगुन तडजोडीअंती 36,000/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले वरून लागलीच सापळा कार्यवाही आजमावण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. त्यानंतर तागड साहेब यांनी सापळा पुर्व कार्यवाही करून सरपंच सौ.सोनु सोळंके यांनी मागणी केलेली लाच रक्कम 36,000/- रू सह माझे जवळ रेकॉरडर सुरू करून पंच क्र.1 श्री.अमोल इंगळे यांचेसह सरपंच सौ.सोनु सोळंके यांची भेट घेणे करीता रवाना केले.

त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील कर्मचारी व अधिकारी असे सोनारखेडा येथील ग्रामपंचायत जवळ, सरपंच यांचे घराजवळ आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री.अमोल इंगळे असे सरपंच सौ.सोनु सोळंके यांचे घरामध्ये गेलो असता सरपंच सौ.सोनु सोळंके हया त्यांचे घरीच हजर होत्या. त्यावेळी सरपंच सौ.सोनु सोळंके यांचेशी माझे कामासंबंधी बोलने झाले त्यानंतर मी पंचासमक्ष लाच रक्कम 36,000/- रूपये सरपंच सौ.सोनु सोळंके यांना दिली. मी माझे मोबाईल वरून तागड साहेब यांचे मोबाईलवर मिस्ड कॉल करून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला .

त्यावेळी सरपंच सौ.सोनु सोळंके यांनी माझेकडुन लाच रक्कम 36,000/- रूपये स्विकारून त्यांचे घराचे हॉलमधून किचनमध्ये जात असतांना तागड साहेब व सर्व सापळा पथक तेथे येवुन सरपंच सौ.सोनु सोळंके यांना महिला पोलीस अंमलदार चित्रलेखा वानखडे यांचे मदतीने ताब्यात घेतले. त्यावेळी पोनी तागड साहेब यांनी सरपंच सौ.सोनु सोळंके यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/कर्मचारी यांचा परिचय करून दिला. त्यानंतर पोनी तागड साहेब यांनी सरपंच सौ.सोनु सोळंके यांच्या कडुन पंचासमक्ष लाच रक्कम 36,000/- रू जप्त केली. त्यानंतर पोनी तागड साहेब यांनी सरपंच सौ.सोनु सोळंके यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सौ. सोनू मुरलीधर सोळंके, वय 30 वर्ष, पद- सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय सोनारखेडा ता.भातकुली जि.अमरावती रा. सोनारखेडा ता.भातकुली जि.अमरावती असे सांगितले. त्यानंतर पोनी तागड साहेब यांनी सरपंच सौ.सोनु सोळंके यांचेसह ला.प्र.वि.कार्यालय अमरावती येथे येवुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला.

एकंदरीत सौ.सोनू मुरलीधर सोळंके, वय 30 वर्ष, पद- सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय सोनारखेडा ता.भातकुली जि. अमरावती यांनी मला दिनांक 11/02/2025 रोजी सरपंच सौ.सोनु सोळंके यांनी मी ग्रामपंचायत सोनारखेडा अंतर्गत दोन वेगवेगळी बांधकामे केले असून केलेल्या कामाचे बिल मिळाले आहे. सदरचे काम मिळवून देवून तसेच त्याचे बिल सुध्दा मिळवून दिले व ग्राम उदापुर येथील बोअरवेलचे काम मिळवून दिले. असे तिनही कामाचे मिळून हिशोब सांगुन तडजोडीअंती 36,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून दि. 11/02/2025 चे अंदाजे 14.28 वा. ते 14.38 वाजेच्या दरम्यान सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष सदर लाचेची रक्कम 36000/- रुपये त्यांचे राहते घरी सोनारखेडा येथे स्विकारले त्यामुळे त्यांचे विरूध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): NURUDDIN MUMTAJDDIN SHEK **or** (किंवा)
**Rank** (पद): PC (Police Constable) **No.**(क्र.): POBN84666
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KISHOR SUDAM WAI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

<u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
दिनांक : ११/०२/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक, अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | श्रीमती सोनु मुरलीधर सोळंके, वय ३० वर्षे, पद—सरपंच, गाव सोनारखेडा, राह. मु. सोनारखेडा, पो. मार्केंडा, ता. भातकुली, जि. अमरावती |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | ११/०२/२०२५ रोजी १४.२८ ते १४.३८ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ४१,०००/—रुपये |
| ५ | तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | ३६,०००/— रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ३६,०००/—रुपये |
| ७ | घटनास्थळ | मु. सोनारखेडा, पो. मार्केंडा, ता. भातकुली, जि. अमरावती इआलोसे यांचे राहते घरी |

**थोडक्यात हकिगत** :— यातील तक्रारदार यांनी दिनांक १०/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती येथे दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक ११/०२/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान श्रीमती सोनु मुरलीधर सोळंके, वय ३० वर्षे, पद—सरपंच, गाव सोनारखेडा, पो. मार्केंडा, ता. भातकुली, जि. अमरावती, राह. मु. सोनारखेडा, पो. मार्केंडा, ता. भातकुली, जि. अमरावती यांनी तक्रारदार यांचे केलेल्या वेगवेगळया बांधकामाचे बिल काढण्यात आले असुन सदर बिलाची रक्कम तक्रारदार यांना प्राप्त झाली आहे. सदरचे कामे मिळुन देण्याकरिता इआलोसे यांनी तक्रारदार यांना मदत केली असुन तक्रारदार यांना मिळालेल्या रक्कमेपैकी बक्षिस म्हणुन तक्रारदार यांचेकडुन रक्कम ४१,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ३६,०००/— रूपये लाच स्विकारण्याचे मान्य केले.

आज दिनांक ११/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान इआलासे श्रीमती सोनु मुरलीधर सोळंके, वय ३० वर्षे, यांनी पंचासमक्ष एकूण ३६,०००/— रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचेविरूध्द खोलापुर पोलीस ठाणे, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री. मंगेश मोहोड, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि., अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पो.नि. संतोष तागड, तसेच पो.नि. योगेशकुमार दंदे, पो.हवा. विनोद धुळे, राजेश मेटकर, पोलीस अंमलदार आशिष जांभोळे, महिला अंमलदार चित्रलेखा वानखडे, विदया पाटील, चालक पोहवा गोवर्धन नाईक व बहिरट यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाचप्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क : ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.**
**ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५,टोल फ्रि नंबर—१०६४**

**(संतोष तागड)**
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि., अमरावती घटक.
मो.न. ९८६७७२०५७२.